# आरोग्य विभाग, जि.प.अकोला

# जिल्हा परिषद सेस फंड योजना

# दुर्धर रुग्णास आर्थिक मदत योजना सन २०२५ -२६

## (जिल्हा परिषद स्तरावर पुरस्कृत योजना)

**प्रस्तावणा :-**

**महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १००३ मधील तरतुदी नुसार जिल्हा परिषदेस आपल्या कार्यक्षेत्रातील रहिवाशांची आरोग्य सुरक्षितता,शिक्षण किंवा त्यांच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतीक कल्याणाचे यामुळे संवर्धन होण्याच्या संभाव्य असेल अश्या उपाययोजनांवर खर्च करण्यात येतो.अकोला जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या उपकर निधितुन अल्पशी मदत देण्याची योजना तयार करुन सन २०२५ -२६ या वर्षात राबवावी या व्दारे ग्रामीण भागातील दुर्धर रुग्णांना आर्थिक मदत देवुन सेवा करण्याकरीता दुर्धर रुग्ण आर्थिक मदत योजना २०२५ -२६ या वर्षाकरीता तयार करण्यात येत आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.४५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लक्ष ) तरतुद करण्यात आली आहे.**

१) योजनेचे नाव :- दुर्धर रुग्णांना आर्थिक मदत योजना सन २०२५-२६

२) योजनेचा कालावधी :- दिनांक १/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६

३) योजनेचे कार्यक्षेत्र :- अकोला जिल्हयातील संपुर्ण ग्रामीण भाग

४) योजनेचे उददेश :- अकोला जिल्हयातील संपुर्ण ग्रामीण भागातील दुर्धर रुग्णकॅन्सर

किडणी निकामी,हदयरोग या आजारावर उपचार व शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या रुग्णास आर्थिक मदत देणे.

**योजनेच्या अटी :-** सदर योजना खालील अटिवर कार्यान्वीत राहील.

- आर्थिक मदत ही हदयरोग कर्करोग व किडणी निकामी रुग्ण यांना देण्यात येईल
- रुग्ण हा अकोला जिल्हयातील ग्रामिण भागातील रहीवासी असावा. यासाठी रुग्णांने संबधीत ग्रामपंचयात सचिवाचे ग्रामिण भागातील रहीवासी असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
- रुग्ण हा दुर्धर रोगाने उदा.हदयरोग, कर्करोग व किडणी निकामी पिडीत असल्याबाबत अधिकृत वैद्यकीय संस्थेच्या तज्ञ डॉक्टराचे अथवा जिल्हा शल्य चिकीत्सक तथा सर्व शासकीय रुग्णालय

महानगर पालिकेचे रुग्णालय किंवा जिल्हा परिषदेचे रुग्णालय यामध्ये उपचार घेत असल्याबाबतचा डॉक्टरांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

- रुग्ण हा भुमिहीन अथवा अल्प भुधारक किंवा दारिद्र रेषेखालील असल्यास अथवा स्वातंत्र सैनिक असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल.त्याकरीता विहीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- रुग्णाने यापुर्वि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मापुले जन आरोग्य योजना व ईतर शासनाच्या योजनेचा लाभ घेतल्या नसल्याबाबतचे हमीपत्र देण्यात यावे.
- वैद्यकीय अधिकारी यांनी सदरहु रुग्णांने योजनेचा यापुर्वी लाभ न घेतल्याबाबत खात्री करुन प्रमाणीत करावे.
- रुग्णांने स्वतचे सही/ अंगठा असलेल्या आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती अर्ज सादर करावा
- आर्थिक मदत ही हदयरोग, कर्करोग व किडणी निकामी या आजारावर उपचार घेणारे लाभार्थी प्रत्येकी रुपये १५,०००/- त्याच्या खात्यामध्ये आर.टी.जी.एस.व्दारे रक्कम जमा करण्यात येईल
- लाभार्थ्याने त्याच्या स्वतःचा बँकपासबुकाची झेरॉक्सची प्रत बॅकेकडुन खाते कार्यरत असल्याबाबत खात्री करुन घेवुन बँक मॅनेजरची त्यावर स्वाक्षरी घेण्यात यावी.बँक खाते कार्यरत नसल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
- सदर योजनेतील रुग्णाची दुर्धर रुग्ण म्हणून निवड करण्याकरीता निवड समिती राहील त्या समितीचे अध्यक्ष हे मा.अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहतील मुख्यकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी जि.प.अकोला हे त्या समितीचे सदस्य राहतील तसेच सचिव म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.अकोला हे काम पाहतील.
- सदर योजनेत नियुक्त झालेल्या समितीने लाभार्थाच्या निवड यादीस मान्यता दिल्यानंतर दुर्धर रुग्णांना आर्थिक मदत मंजुर करण्यात येईल.
- लाभार्थींने लाभाकरीता परिपुर्ण अर्ज प्रस्ताव कार्यक्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सादर करावा व वैद्यकीय अधिकारी यांनी अर्जाची व लाभार्थींची प्रत्यक्ष तपासणी करुनच परिपुर्ण अर्ज जिल्हा स्तरावर सादर करावा.व लाभार्थीने परस्पर अर्ज प्रस्ताव सादर करु
- पात्र लाभार्थांना लाभाची रक्कम आर.टी.जी.एस.व्दारे त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल त्यासाठी लाभार्थांचे बॅक पासबुक कार्यरत असणे अनिर्वाय आहे.
- सदर लाभार्थी हा लाभाकरीता एकदाच पात्र राहील.

वरिलप्रमाणे अक्र. १ ते १४ या शर्ती व अटीवर दुर्धर रुग्ण आर्थिक मदत योजना कार्यान्वित राहील.

## लाभार्थी

सर्व नागरिक

## लाभ :

वरील प्रमाणे

## अर्ज कसा करावा

रहिवासी असलेल्या कर्याशेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दुर्धर आजारी लाभार्थी यांनी अर्ज करावा .

## अधिक माहिती करिता :

फाईल जोडली आहे

## संपर्क :

जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद अकोला दुरध्वनी क्र - ०७२४ - २४३७३७०,

ई-मेल : dhoako@rediffmail.com